महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/121/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2025 / दिनांक : 27/03/2025

---

# नांदेड पोलीस दल व त्यांचे कुंटूबांकरीता श्री गुरू गोविंद सिंह जी उद्यान व ओंमकार ध्यान धारणा केंद्राचे उदघाटन..

**मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांची पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे मानसीक आरोग्य सुधारण्याकरीता, ताण व्यवस्थापणाकरीता पोलीस मुख्यालय नांदेड येथे निसर्ग संप्पन वातावरण तयार करावे या संकल्पनेतून मा. पोलीस अधीक्षक यांनी गुरूव्दारा लंगर साहेब, श्री हुजुर साहेब नांदेड (ग्रीन सिटी प्रोजेक्ट) चे संत बाबा नरिन्दर सिंघ जी, संत बाबा बलविंदर सिंघ जी कारसेवावाले यांचे सहयोगाने श्री गुरू गोविंद सिंह जी उद्यान व ओंमकार ध्यान धारणा केंद्र पोलीस मुख्यालय कवायत मैदान नांदेड येथे निर्माण करण्यात आले. उद्यानाच्या निमित्ताने प्रसन्न, नयनरम्य, मनशांती देणाऱ्या परिसराची निर्मीती पोलीस मुख्यालयात करण्यात आली आहे. मा. श्री. **शहाजी उमाप** पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे हस्ते सदर उद्यान व ओंमकार ध्यान धारणा केंद्राचे आज दिनांक 27.03.2025 रोजी उदघाटन करून पोलीस अधिकारी/अंमलदार व त्यांचे कुंटूबीय यांचेसाठी सुरू करण्यात आले.

सदर उद्यानात विविध आयुर्वेदिक औषधी, वनस्पती, फुलपाखरांचे उद्यान, पाखरांचा कोपरा म्हणुन पक्षाना आवडणारी झाडे तसेच सिता पंचवटी, नवगृह अशी विविध वनस्पतींची लागवड करण्यात आलेली आहे. येणाऱ्या प्रत्येकांना तेथे निसर्गाचा आनंद घेता येईल अशा रितीने लॉन, कारंजे, बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर उदघाटन कार्यक्रमास **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड, सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, श्रीमती डॉ. अश्विनी जगताप, पोलीस उप अधीक्षक (गृह) नांदेड, उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक स्थागुशा नांदेड, संत बाबा बलविंदर सिंघ जी कार सेवा वाले, दिलीप चोपडे, पोलीस निरीक्षक मोटार परिवहन विभाग, विजय धोंडगे, राखीव पोलीस निरीक्षक, नांदेड तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार असे उपस्थित होते.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड